क्र.का.३/संगणक/जुने दस्तऐवज स्कॅनिंग/२०१३/२१९
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय.
दिनांक- १४/०५/२०१३.

**प्रति**,

सर्व दुय्यम निबधक

(नोंदणी उपमहानिरीक्षक यांचे मार्फत)

**विषय** - सन २००१ पुर्वी नोंदणीस दाखल करण्यात आलेल्या, स्कॅनिंगसाठी शिल्लक दस्तऐवजांबाबत तसेच ५४ नवीन दुय्यम निबंधक कार्यालयातील दस्तांबाबत.

सन २००१ पुर्वी नोंदणीसाठी स्विकारण्यात आलेल्या जवळपास सर्व दस्तऐवजांचे शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालय पुणे येथे छायाचित्रण/स्कॅनिंग करण्यात आले असून त्यापैकी काही दस्तांचे स्कॅनिंग करणे शिल्लक आहे, .तसेच सन २००८ व २००९ या वर्षामध्ये नव्याने सुरु करण्यात आलेल्या ५४ दुय्यम निबंधक कार्यालयातील दस्तांची डाटा एंन्ट्री व स्कॅनिंग शिल्लक आहे.

या दोन्ही प्रकारच्या दस्तांची डाटा एंन्ट्री व स्कॅनिंग करण्याकरीता, आय-सरिता प्रणालीमध्ये (दुय्यम निबंधक कार्यालयात पुरविलेल्या MPLS VPN कनेक्टिव्हीटीद्ववारे) ही सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली असून ती सध्या "http://10.187.203.70/manual1985/login.aspx " या URL दवारे उपलब्ध आहे. याचे सविस्तर प्रशिक्षण दि. २७/४/२०१३ रोजीच्या व्हिडीओ कॉन्फरन्स मध्ये देण्यात आले आहे. तसेच help file सोबत माहितीसाठी जोडली आहे.

तरी वरील परिच्छेद क्र १ मध्ये नमूद प्रकारचे काम शिल्लक असलेल्या दुय्यम निबंधक कार्यालयांनी या सुविधेचा वापर करुन शिल्लक सर्व दस्तांची डाटा एंन्ट्री व स्कॅनिंग त्वरीत पुर्ण करावे.

या संदर्भात काही सर्वसाधारण सूचना पुढीलप्रमाणे देण्यात येत आहेत-

१) सदर डाटा एंन्ट्री व स्कॅनिंगचे काम कार्यालयीन कर्मचा-यांनी पुर्ण करावयाचें आहे.

२) स्कॅनिंग केल्यानंतर, ते योग्यरितीने स्कॅन झाल्याची खातरजमा करुनच अपलोड करण्यात यावे. त्याची थंबनेल प्रिंट काढण्याची आवश्यकता नाही.

३) सन २००१ पुर्वीच्या दस्ताचे छायाचित्रण/स्कॅनिंग झाले असल्यास दुबार स्कॅनिंग करण्यात येवूं नये.

४) या सुविधेमध्ये डाटा व स्कॅन इमेज थेट मध्यवर्ती सर्वरवर साठवली जाणार असल्याने सीडी तयार करण्याचा प्रश्नच उदभवत नाही.

mmm.doc

५) आय-सरिता प्रणालीमध्ये नोंदणीस स्विकारलेल्या कोणत्याही दस्ताची डाटाएंट्री/स्कॅनिंग या प्रणालीमध्ये करु नये.

६) या प्रमाणे सुविधा दुय्यम निबंधक कार्यालयात उपलब्ध करुन देण्यात आली असल्यामुळे यापुढे, शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालय पुणे, यांचेकडे दस्तऐवज स्कॅनिंगसाठी पाठवू नयेत. .व्यवस्थापक, शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालय पुणे, यांनी त्यांचेकडे स्कॅनिंगसाठी शिल्लक असलेले दस्तऐवज संबंधित दुय्यम निबंधक कार्यालयाकडे उपरोक्तप्रमाणे कार्यवाहीसाठी परत पाठवावेत. शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालय, पुणे यांनी मुळ दस्त परत पाठविताना, विहित प्रक्रियेचे पालन करावे, कोणताही दस्तऐवज चुकीच्या कार्यालयात पाठविला जाणार नाही, याची दक्षता घ्यावी. तसेच यासंबंधीचा सर्व पत्रव्यवहार व पोहोच योग्यरितीने जतन करुन ठेवावेत.

सही/- (एस.चोक्कलिंगम्)
**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे.**

प्रत:

सर्व नोंदणी उपमहानिरीक्षक

२/- सदर पत्राची प्रत सर्व सह जिल्हा निबंधक आणि दुय्यम निबंधक यांना त्वरीत पाठविण्यात यावी.

१) सर्व सह जिल्हा निबंधक
२) व्यवस्थापक, शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालय पुणे.
३) सर्व कार्यासन अधिकारी

**निर्गमित**

**नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक,**
**(संगणक),महाराष्ट्र राज्य,पुणे.**

mmm.doc